**नियमित दिवाणी दावा क्र. ३४/२०२१**
**निशाणी २१ व २३ खाली सामायिक आदेश**

वादींनी सदरचा दावा वाटप, जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. सदर दावा चालू असतांना वादी क्र. ५ राजेंद्र निवृत्ती डोकफोडे/डोईफोडे हे दिनांक ०३.०२.२०२१ रोजी मयत झाले. दरम्यानच्या काळात कोवीड १९ संचार बंदीमुळे व वादी दु:खात असल्यामुळे मयताचे वारसांना मुदतीत दाव्यात सामील करता आले नाही. त्यामुळे अॅबेटमेंट सेट असाईड करण्यात यावी व वारस अभिलेखावर घेण्यात झालेला विलंब माफ होवुन वादी क्र. ५ चे खालील वारस अभिलेखावर घेण्यात यावेत. वादीचे वारस पुढिलप्रमाणे :—

**५अ**. श्रीमती विजया राजेंद्र डोईफोडे/डोकफोडे,
वय ५२, धंदा : गृहीणी,
**५ब**. श्री. प्रसाद राजेंद्र डोईफोडे/डोकफोडे,
वय २५, धंदा : नोकरी,
५अ व ५ब रा. आर्टिलरी सेंटर रोड, जैन कॉलनी,
नाशिकरोड, ता.जि. नाशिक,
**५क**. पुजा विशाल धोंगडे, वय ३२, धंदा :
गृहीणी, रा. आर्टिलरी सेंटर रोड, धोंगडे मळा,
नाशिकरोड, ता.जि. नाशिक,

**२.** प्रतिवादींनी अर्जास म्हणणे दाखल केले की, अर्ज व अर्जातील मागणी मुदतीत नाही. वारस अभिलेखावर घेण्यास ७ महीन्यांचा उशीर झालेला आहे. त्यामुळे अर्ज रद्ध करण्यात यावा.

**३.** अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादी क्र. ५ राजेंद्र निवृत्ती डोकफोडे/डोईफोडे हे दिनांक ०३.०२.२०२१ रोजी मयत झाले आहेत. वादींनी दावा वाटप, जाहीर ठराव व मनाई हुकुमासाठी दाखल केला आहे. त्यामुळे वादी क्र. ५ चे पश्चात त्याचे वारसांना दावा चालविण्याचा हक्क आहे. वादीने प्रस्तुतचा अर्ज दिनांक १२.१०.२०२१ रोजी दाखल केलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्यास विलंब झालेला आहे. परंतु सदरचा कालावधी हा लॉकडाउन मधील आहे. त्यामुळे सदरचा विलंब माफ करण्यात येतो. वादींना वादी क्र. ५ चे वारस रेकॉर्डवर घेण्याची परवानगी देण्यात येते. अर्ज मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही उलट दाव्याचे कामकाज सुलभ चालण्यास मदतच होईल. वरील कारणमिमांसेवरून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे :—

**आदेश**

१. वादींचा अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादींनी वादी क्र. ५ चे वारस रेकॉर्डवर घेवून १४ दिवसांत दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

सही/—
(श्रीमती सि.व्हि. शिरसाट)
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, सिन्नर

ठिकाण : सिन्नर
दिनांक : ०५.०४.२०२२